

# मातृ - पितृ कृपातीर्थ तारक मंत्र

नि:शंक हो । निर्भय हो । मना रे ।
प्रचंड मातृपितृ बळ पाठीशी रे ।
अतर्क्य अवधूत हे स्मरणगामी ।
अशक्यही शक्य करतील स्वामी ।।
जिथे मातृपितृ पाय तिथे न्यून काय ।
स्वये भक्त प्रारब्ध घडवी ही माय ।
आज्ञेविण काळ ना नेई त्याला ।
परलोकीही ना भिती तयाला ।।
उगाची भितोसी भय हे पळू दे ।
जवळी उभी ही अमृतशक्ती कळू दे ।
जगीं जन्ममृत्यु असे खेळ ज्यांचा ।
नको घाबरु । तू असे बाळ त्यांचा ।।
खरा होई जागा श्रध्देसहित ।
कसा होशी त्याविण तु मातृपितृ भक्त।
कितींदा दिला बोल त्यांनीच हात
नको डगमगू मायबाप देतील साथ।।
विभूती नमन नाम ध्यानादी तीर्थ ।
मातृपितृ अमृत देवच या पंचप्राणामृतांत ।
हे तीर्थ घे आठवी रे प्रचीती ।
न सोडी कदा स्वामी ज्या घेई हाती ।
मातृपितृ हे ची खरेच सार्थक देव
नाही जगात दुसरी काही अमृत ठेव ।
या बालका कडून जरी झाली काही चूक
घेतील सांभाळुनी ही मौल्यवान रत्ने मारूनी हाक ।
पूर्णविराम दयावा येथील नाटकी मायाजाळास
घेऊनी कुशी उजळावी या बालकाचे जीवनास ।
।। श्री मातृपितृऽर्पणमस्तु ।।
।। अनंत कोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज योगिराज
श्री सद्गुरु अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज की जय ।।